कोरोना विषाणू प्रसारास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर मर्यादित कालावधीसाठी स्थगित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः समय- २०२०/ प्र. क्र.३१/ १८ (र. व का.)
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ मार्च, २०२०.

शासन परिपत्रक :

जगभरातील अनेक देशांमध्ये कोरोना विषाणूंचा प्रसार झाला आहे. त्यामुळे आरोग्यविषयक गंभीर समस्या निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणावर जिवित हानी होत आहे. कोरोना विषाणूंमुळे बाधित रुग्ण आपल्या देशातील काही ठिकाणी आढळून आले आहेत.

२. वरील पार्श्वभूमीवर, कोरोना विषाणूंचा प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमधील बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीचा वापर पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात येत आहे. या कालावधीमध्ये अधिकारी / कर्मचारी यांची कार्यालयातील उपस्थिती पूर्वीप्रमाणे हजेरीपटावर नोंदविण्यात यावी. यासंदर्भात विभाग / कार्यालयांतील आस्थापना शाखांनी आवश्यक ती उपाययोजना करावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०२००३१६१३०७२९४५०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Bhaskar Gaikwad

Digitally signed by Rajesh Bhaskar Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5b1378a498cdff3fdd9ea5370b71fae3eca97e85924d0e443758ade5f0221f9a, serialNumber=26e171ec96c63f6333217d12fb6da1c5a800ce18a7a6fd59abf19b8ed3f02a91, cn=Rajesh Bhaskar Gaikwad
Date: 2020.03.16 13:10:49 +05'30'

(रा. भा. गायकवाड)
कक्ष अधिकारी

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती),
२. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती),
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
६. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
७. मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,

८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
११. प्रबंधक , लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय,
१२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१५. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१६. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी,
१९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२०. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२२. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी. ओ. बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
२३. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५.
२४. नॅशनल काँग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-२१.
२५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८.
२६. बहुजन समाज पार्टी,डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१,
२७. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई.
२८. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी मुंबई.
२९. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३०. निवड नस्ती (कार्यासन १८).